**सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्याच्या पाल्याच्या शैक्षणिक कारणास्तव शासकीय निवासस्थानात वास्तव्याची मुभा देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक GAD-42011/1/2026-GAD(DESK-23A)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६

**वाचा :-** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे २०१२/प्र.क्र.८९/सेवा-४, दि.१६ फेब्रुवारी, २०१३
२) शासन निर्णय, क्र.शानिवा १५१८/प्र.क्र.४६१/२३-अ, दि.०७ जानेवारी, २०२१
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.सेनिवे २०२६/प्र.क्र.३५/सेवा-४, दि.०३ जून, २०२६

**शासन निर्णय** :-

केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, २०२१ मधील नियम ६८ च्या धर्तीवर वित्त विभागाने सं.क्र. ३ येथील दिनांक ०३ जून, २०२६ च्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत शासकीय निवासस्थान रिक्त न केल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. **जे शासकीय कर्मचारी सक्तीने सेवानिवृत्त किंवा बडतर्फ झाले आहेत त्यांच्याबाबतही वरील शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील.**

२. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्याचे पाल्य शालेय शिक्षण (इयत्ता १ ली ते १२ वी) घेत असेल आणि त्याचे शैक्षणिक वर्ष जूनमध्ये संपत असेल तर त्यास त्यापुष्ट्यर्थ आवश्यक ती कागदपत्रांच्या अधीन राहून शासकीय निवासस्थानामध्ये **विद्यमान अनुज्ञप्ती शुल्काच्या पाच पट इतक्या दराने** पुढीलप्रमाणे वास्तव्याची मुभा देण्याचा शासन निर्णय घेत आहे-

अ) कर्मचारी माहे जानेवारी ते जून महिन्यात सेवानिवृत्त होत असेल तर त्यास त्या वर्षाच्या जून अखेरपर्यंत शासकीय निवासस्थानात वास्तव्याची मुभा लागू राहील.

(उक्त महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक वर्ष लक्षात घेऊन त्यानुसार शासकीय निवासस्थानाचा ताबा सोडून अन्यत्र स्थलांतरीत होऊन त्या ठिकाणी त्यांच्या पाल्यांच्या शालेय प्रवेशाची व्यवस्था करणे आवश्यक राहील.)

आ) एखादा कर्मचारी माहे जुलै ते डिसेंबर महिन्यात सेवानिवृत्त होत असेल व त्या वर्षात जर त्यांचे पाल्य शालेय शिक्षण (इयत्ता १ ली ते १२ वी) घेत असल्यास त्या कर्मचाऱ्यास पुढील कॅलेंडर वर्षाच्या जूनअखेरपर्यंत वास्तव्याची मुभा लागू राहील.

उदा. एखादा कर्मचारी माहे जुलै ते डिसेंबर, २०२६ मध्ये सेवानिवृत्त होत असेल तर त्यास दि.३० जून, २०२७ पर्यंत वास्तव्याची मुभा राहील.

मात्र सदर कालावधी संपुष्टात आल्यावर शासकीय कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थान त्वरित रिक्त करणे आवश्यक राहील. अन्यथा दि.०३.०६.२०२६ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारितील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थानांसाठी तसेच राज्यातील इतर सर्व शासकीय निवासस्थानांसाठी लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१४१५३०१७८४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SANGEETA AJIT SHINDE

Digitally signed by SANGEETA AJIT SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=BA607066E7A34E428B7C7C73DE0F7E09A315A2AF5075FD47F1E08389AA137B81, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DDF4C16E4A3043BBAA409E4ECF901CA0490CE93C66913DE88A7769927FF5E261, cn=SANGEETA AJIT SHINDE
Date: 2026.08.14 15:31:11 +05'30'

**( संगीता अ. शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८. मा. उप सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा. विरोधी पक्षनेता ( विधान सभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०. मा. विरोधी पक्षनेता ( विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
११. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१४. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
१५. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१६. प्रबंधक, अपिलेट शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१७. पोलिस, महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई
१९. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०. सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालये
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२२. सर्व कार्यकारी अभियंता/उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
२३. निवडनस्ती